**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
**Savitribai Phule Pune University**
**(Formerly Pune University)**
**Ganeshkhind, Pune – 411007**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**दुरध्वनी क्र.: ०२०-२५६२११८८/८९/९०**
Telephone : **020-25621188/89/90**
**इ-मेल/Email: - affiliation@pun.unipune.ac.in**

**शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)**
**Academic Section (Affiliation Unit)**
**संकेतस्थळ/Website: www.unipune.ac.in**


**संदर्भ क्र. : सीए/**२०३६

**दिनांक :** २६/१२/२०२५

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित
सर्व संबंधित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था

**विषय – महाविद्यालयाच्या स्थानांतरणाबाबत...**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून प्राप्त आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्नित असलेले काही महाविद्यालय/परिसंस्थांनी त्यांना महाराष्ट्र शासनाची अंतिम मान्यता मिळालेल्या जागेऐवजी इतरत्र शासनाचे पूर्वपरवानगी व विहीत प्रक्रियेशिवाय स्थलांतरित झाल्याबाबत या विभागास तक्रारी प्राप्त होत आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११८ मधील तरतुदीनुसार राज्य शासनाची सहमती घेतल्यानंतर विद्यापीठाकडून परवानगी देण्यात येईल तसेच कलम १०८ (१) (झ) मधील तरतुदीनुसार विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीशिवाय, व्यवस्थापनामध्ये कोणताही बदल किंवा त्यांचे हस्तांतरण किंवा महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या स्थानात बदल करण्यात येणार नाही.

महाविद्यालय स्थानांतरणासाठी प्रस्तुत विद्यापीठाकडे रितसर अर्ज करून विद्यापीठाचे ना हरकत प्रमाणपत्र घेवून त्यानंतर शासनाची परवानगी घेवून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११८ मधील तरतुदीस अनुसरून स्थानांतरण करणे आवश्यक आहे.

ज्या महाविद्यालयांनी स्थानांतरणासाठी विद्यापीठाचे ना हरकत पत्र न घेता तसेच शासनाची परवानगी न घेता परस्पर महाविद्यालय स्थलांतरित केले आहेत अशा महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२६– २०२७ पासून विद्यार्थी प्रवेशित करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपली,

उपकुलसचिव,
(संलग्नता कक्ष)